ही चित्रे पहा.



# दात









© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४००००५.
प्रकाशक: इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
(विद्याभारती), पुणे-४११०२१

दातांचे आणखी काही
उपयोग पाहू.

दातांचा आपल्याला आणखी कोणता उपयोग होतो ?
एक गंमत करून पहा.
चित्रात दाखविल्याप्रमाणे तोंडाचा ‘आ’ करा.
तोंड मिटायचे नाही.
आता ही अक्षरे मोठ्याने वाचा.




त, थ, द, ध, न,

काय अडचण येते ?

आता तोंड मिटून त, थ, द, ध, न, म्हणा.
जीभ दातावर आपटते.

**बोलण्यासाठी दातांचा उपयोग होतो.**

आपण जेवताना भाकरी, पोळी, भात दातांनी चावतो. चावून चावून बारीक करतो. ह्यावेळी घासात तोंडातली लाळ मिसळते. घास चावून खाल्ला की चवही कळते.



कधी कधी आपल्याला चव घ्यायची नसते. औषधाची गोळी आपण दातांनी तोडत नाही.



दात नसतील तर स्पष्ट बोलता येत नाही. बोबडे बोलावे लागते. दात नसतील तर गाजर, कैरी, ऊस चावता येत नाही. खूप शिजवून मऊ केलेले अन्न खावे लागते.

दात पडले तर तोंडाचा आकार बदलतो. माणूस म्हातारा दिसतो.



दात फार उपयोगी आहेत. दात पडू नयेत, दात किडू नयेत, ह्यासाठी काय काळजी घ्यायची ?